# 'ऑरगॅनिक किचन गार्डनिंग'वर होणार दोनदिवसीय कार्यशाळा

**पुणे** : रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे रसायन मुक्त अन्नाची गरज अधोरेखित होत असताना घरच्या घरी सेंद्रिय भाजीपाला उत्पादनाला चालना देण्यासाठी राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था (एनआयपीएचटी), तळेगाव दाभाडे यांच्या वतीने शनिवारी आणि रविवारी (ता. ३१) 'ऑरगॅनिक किचन गार्डनिंग वर्कशॉप : ओनग्रोन पद्धत' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे संचालक तथा सहकार विभागाचे अपर निबंधक मिलिंद आकरे यांनी दिली.

स्वतःच्या घरात सेंद्रिय भाजीपाला पिकविण्याची संकल्पना रुजविण्यासाठी ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ओनग्रोन पद्धत विकसित करणाऱ्या नैसर्गिक शेतीतज्ज्ञ सरस्वती कुवळेकर या कार्यशाळेत सहभागींना प्रत्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत.

''कृत्रिम व रासायनिक खतांचा तसेच कीटकनाशकांचा वापर न करता निसर्गाने दिलेली पाने, फांद्या आणि शेतीतील नैसर्गिक उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करून भाज्या पिकविण्याच्या पद्धतीला 'स्वयंपोषी' अर्थात 'ओनग्रोन पद्धत' म्हटले जाते. या पद्धतीमुळे मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमध्ये अगदी लहान बाल्कनी, विंडो ग्रिल, गच्ची किंवा अंगणातही भाजीपाला बाग उभारणे शक्य झाले आहे. अगदी एक फूट आकाराच्या कुंड्यांमध्येही स्वतःच्या घरात हे तयार करणे शक्य आहे,'' असे कुवळेकर यांनी सांगितले.